मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | रविवार, दि. 8 सप्टेंबर 2024 | पान- 1

# बदलीस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावाची फाईल तयार : शेखर सिंह

## महापालिकेच्या सामान्य प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा प्रस्ताव : निवडणूक कालावधीत साहाय्यक आयुक्तांच्या देखील बदल्या होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आस्थापनेवरील विभाग प्रमुखाच्या मर्जीतील अधिकारी, कर्मचारी हे वर्षानुवर्षे एकाच विभागात ठाण मांडून कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांचे लागेबांधे तयार होऊन अर्थपूर्ण वाटाघाटीत वाढल्या आहेत. यामध्ये स्थापत्य, आरोग्य, वैद्यकीय, करसंकलन, भांडार, उद्यान यासह अन्य विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.



मात्र, महापालिकेच्या सामान्य प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा प्रस्ताव तयार केला आहे. ३१ ऑगस्ट अखेरपर्यंत पात्र अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदली होतील, असे सांगण्यात आले. परंतु, आयुक्त शेखर सिंह यांना वेळ मिळत नसल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्यासाठी मुहूर्त लागत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे बदलीस पात्र असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे चांगलेच फावले आहे.

महापालिका आयुक्तांनी विभागातील गट अ ते गट ड मधील जे अधिकारी व कर्मचारी हे एप्रिल व मे २०२४ या महिन्यात बदलीस पात्र ठरतात. त्यांची यादी व ज्या अधिकारी, कर्मचा-यांना वैयक्तिक, वैद्यकीय कारणास्तव बदलीचे अर्ज द्यायचे असतील. असे अर्ज हे ८ ऑगस्ट पर्यंत विभाग प्रमुखांकडून सामान्य प्रशासनाकडे आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावेत, असे आवाहन आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले होते.

त्यानुसार महापालिकेच्या गट अ आणि ब मधील ३६ अधिकारी तर गट क मधील तब्बल ३२९ कर्मचारी आणि टेक्निकल संवर्गातील ७१ कर्मचारी हे बदलीसाठी पात्र झालेले आहेत. त्यामुळे महापालिकेत बदलीसाठी ४३६ अधिकारी-कर्मचाऱ्यांची उचलबांगडी कधी होणार याकडे लक्ष लागले होते.

### बदली धोरणास हरताळ

» मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महापालिका सेवेतील 'वर्ग- अ' ते 'ड'पर्यंतच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात २०१५ मध्ये धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार एप्रिल व मे महिन्यात बदल्या करणे अपेक्षित असते. यामध्ये वर्ग एक व दोन मधील अधिकाऱ्यांच्या तीन वर्षांत आणि वर्ग तीन आणि चार मधील कर्मचाऱ्यांच्या सहा वर्षे पूर्ण झाले आहेत. त्यांच्या बदल्या होणे अपेक्षित आहे. पण, या धोरणाकडे दुर्लक्ष करून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदली धोरणाला हरताळ फासला जात आहे.

> “ येत्या दोन- चार दिवसांत सर्वांच्या बदल्या करण्यात येतील. यामध्ये वर्ग तीन आणि चारमधील कर्मचाऱ्यांच्या अगोदर करण्यात येतील. त्यानंतर वर्ग दोनमधील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जातील. तर क्षेत्रीय अधिकारी यांच्या बदल्या विधानसभा निवडणूक पार पडल्यानंतर करण्यात येणार आहेत. निवडणूक कालावधीत साहाय्यक आयुक्तांच्या देखील बदल्या होणार आहेत.
>
> \- शेखर सिंह, आयुक्त- पिंपरी चिंचवड महापालिका

# दोन आठवड्यानंतरही निळ्या पूररेषा सर्वेक्षण सुरूच

## सुमारे 60 टक्के सर्वेक्षण झाल्याचे अधिकारी सांगत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील पवना, मुळा, इंद्रायणी नद्यांच्या पूररेषेत बांधकामे उभारल्याने थोड्या पावसानेही पूर येत असल्याने निळ्या पूररेषेतील बांधकामांचे सर्वेक्षण करून यावर आठ दिवसात कारवाई करण्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले होते. मात्र, दोन आठवडे उलटून गेले तरीही सर्वेक्षण सुरूच आहे. सुमारे 60 टक्के सर्वेक्षण झाल्याचे अधिकारी सांगत आहेत.



शहरात लोकसंख्यावाढ होऊ लागल्याने अनेक भागांत पुनर्विकास होत आहे. चाळी, बैठी घरे, झोपडपट्टी, बंगले तोडून टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. परंतु, त्या भागातील ड्रेनेजलाइन जुन्या व कमी क्षमतेच्या असल्याने सांडपाणी तिपटीने वाढून त्या वारंवार तुंबत आहेत. नदीपात्रातील पूररेषेत बांधकामे वाढल्याने पूरस्थिती उद्भवत आहे, असे सांगत सर्वेक्षण करून कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले होते.

### अतिक्रमण व बांधकामे काढण्यात येणार

» नैसर्गिक ओढे, नाल्यांवर अतिक्रमण झाले आहे. काही बिल्डरांनी नाले बुजवून कमी व्यासाच्या वाहिन्या टाकल्या आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन रस्त्यावर आणि सखल भागात पाणी साचून राहत आहे. आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रत्येकी एक ओढा व नाल्यावरील अतिक्रमण व बांधकामे काढण्यात येणार आहेत. सर्वेक्षण सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# रक्षक चौकातील भुयारी मार्गासाठी 40 झाडे तोडणार

## पिंपळेनिलख येथील संरक्षण हद्दीतील रक्षक चौक ते गावठाणातून जाणा-या रस्त्यावर भुयारी मार्ग तयार करण्यात येणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळेनिलख येथील संरक्षण हद्दीती रक्षक चौक ते गावठाणातून जाणा-या 18 मीटर रस्त्यावर भुयारी मार्ग तयार करण्यात येणार आहे. या कामास अडथळा ठरणारी 40 झाडे तोडण्यात आली आहेत.

सांगवी फाटा ते रावेत बीआरटीएस मार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पिंपळे निलख येथील रक्षक सोसायटी चौकात भुयारी मार्ग (सब-वे) उभारण्यात येणार आहे. भुयारी मार्गाच्या कामात अडथळा ठरणारी झाडे काढण्यासाठी महापालिकेच्या उद्यान विभागाने परवानगी दिली आहे. त्यानुसार नऊ रेनट्री, काटेरी बाभूळ, सहा बोर, आठ शिसू, एक सुबाभूळ, तीन ग्लेरीसिडीया, एक शिरस तीन इतर अशी एकूण 40 झाडे तोडण्यात आली आहेत. तर, पाच पिंपळ, एक कॅशिया, दोन भेंडी, कडूलिंब, एक कांचन, दोन तपशी अशा 13 झाडांचे पुनर्रोपन करण्यात येणार आहे. त्या झाडाचे पुनर्रोपन केल्यानंतर अहवाल सादर करावा लागणार आहे.



पिंपळेनिलख मधून बाणेर, बालेवाडी भागात जाता येते. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. हिंजवडीतील माहिती व तंत्रज्ञाननगरीतील कर्मचारी या रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे वाहनांची संख्या वाढून रक्षक सोसायटी चौकात नेहमीच वाहतूक कोंडी होते. त्यावर उपाययोजना म्हणून भुयारी मार्ग उभारण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. या 18 मीटर रस्त्यास भुयारी मार्ग उभारण्यासाठी सात कोटी 62 लाख आठ हजार 213 रुपये दराची निविदा प्रक्रिया महापालिकेने राबवली होती. सर्वात कमी दराची पाच कोटी 73 लाख 10 हजार 806 रुपये दराची एचसी कटारिया कंपनीची निविदा स्वीकारली आहे.

# सर्व शाळांच्या कामगारांची चारित्र्य पडताळणी; शालेय शिक्षण विभागाचे आदेश

## बदलापूर येथे घडलेल्या लैंगिक अत्याचार घटनेनंतर विद्यार्थ्यांचा प्रश्न ऐरणीवर, कंत्राटी कामगारांची धावपळ

**पुणे | प्रतिनिधी**

बदलापूर येथे घडलेल्या लैंगिक अत्याचार घटनेनंतर विद्यार्थ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर खडबडून जागे झालेल्या शिक्षण विभागांसह पोलिसांनीदेखील आता शाळेतील कंत्राटी कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या चारित्र्य पडताळणी तत्काळ करण्याबाबतच्या सूचना शाळांना दिल्या आहेत.

कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कामगार आणि कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यासाठी शाळांची धावपळ सुरू झाल्याचे दिसून येत आहे. शहरातील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील विशेषतः कंत्राटी पद्धतीने काम करत असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह शाळांचे व्हॅनचालक, रिक्षावाले काका, मदतनीस, स्वच्छता कामगारांची पडताळणी करून घेण्यासाठी शाळा सध्या प्रयत्नशील आहेत.

दरम्यान, मागील आठवड्यात पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शाळा, संस्थाचालक, मुख्याध्यापकांची बैठक घेतली. या बैठकीत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. त्याप्रमाणे नियमित कर्मचाऱ्यांबरोबरच कंत्राटी पद्धतीने नियुक्त होणारे सुरक्षारक्षक, सफाई कामगार, मदतनीस, स्कूल बसचालक अशा संबंधित व्यक्तींची चारित्र्य पडताळणी करण्याबाबत सूचना शाळांना दिल्या आहेत. त्यामुळे, कंत्राटी कर्मचाऱ्यांनी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तत्काळ शाळेत जमा करावे, असे मुख्याध्यापकांनी आणि व्यवस्थापकांनी संबंधित कर्मचाऱ्यांना सांगितले. त्यामुळे त्या-त्या ठिकाणी असणाऱ्या स्थानिक पोलिस यंत्रणेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांची, कामगारांची चारित्र्य पडताळणी करून घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

केवळ नियमित कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे तर सुरक्षा रक्षक, स्वच्छता कर्मचारी, स्कूल बस ड्रायव्हर आणि मदतनीस अशा सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांची चारित्र्य तपासणी केली जाईल याची खात्री करण्यासाठी पोलिसांनी शाळांना सूचना दिल्या आहेत.

मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापकांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना तत्काळ चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे सादर करण्याची आवश्यकता असल्याची माहिती दिली आहे. परिणामी, पडताळणीची प्रक्रिया जलद करण्यासाठी अनेक शाळा स्थानिक पोलिस ठाण्यांशी समन्वय साधत आहेत.

पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नंदकुमार सागर यांनी निदर्शनास आणून दिले की, अनेक प्रकरणांमध्ये आरोपी व्यक्ती पुराव्याअभावी किंवा बाह्य दबावामुळे कायदेशीर परिणामांपासून वाचण्यात यशस्वी होतात. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सरकार आणि पोलिस अधिकाऱ्यांनी अधिक मजबूत, अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला.




**चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र**

» कंत्राटी कर्मचाऱ्यांनी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तत्काळ शाळेत जमा करावे, असे मुख्याध्यापकांनी आणि व्यवस्थापकांनी संबंधित कर्मचाऱ्यांना सांगितले. त्यामुळे त्या-त्या ठिकाणी असणाऱ्या स्थानिक पोलीस यंत्रणेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांची, कामगारांची चारित्र्य पडताळणी करून घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

> शिक्षण विभागांसह शहर पोलीस आयुक्तांनीदेखील शाळेतील कंत्राटी कामगार आणि कर्मचा ऱ्यांची चारित्र्य पडताळणी करण्यात यावी, अशी सूचना केली. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते शाळा व्यवस्थापनाकडे जतन करून ठेवण्यात येईल. परंतु, एकदा हे प्रमाणपत्र काढल्यानंतर ते कधीपर्यंत ग्राह्य धरले जाईल? काही ठराविक वर्षांनंतर परत नव्याने चारित्र्य पडताळणी करून घ्यायची की नाही, याबाबत कोणतीही स्पष्टता नाही.
>
> \- सुजित जगताप, अध्यक्ष, पुणे शहर मुख्याध्यापक संघ.

> शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार शाळेतील विशेषतः कंत्राटी कामगार आणि कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. त्या-त्या ठिकाणच्या पोलिसांकडून संबंधित कर्मचाऱ्यांची पडताळणी केली जात आहे. परंतु, केवळ चारित्र्य पडताळणी करून प्रश्न सुटणार आहे का?, अनेक घटनांमध्ये संबंधित आरोपी पुराव्याअभावी आणि दबावामुळे सुटतात. त्यामुळे शासन आणि पोलीस यंत्रणेने त्याबाबत सक्षम पावले उचलायला हवी.
>
> \- नंदकुमार सागर, अध्यक्ष, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ.

# पूजा खेडकर आयएएस सेवेतून बडतर्फ; केंद्राची कारवाई

## ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकरबाबत केंद्र सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पूजा खेडकर आयएएस सेवेतून बडतर्फ; केंद्राची कारवाई

बोगस प्रमाणपत्र जमा करून आयएएस झालेल्या पूजा खेडकरवर आता यूपीएससीने मोठी कारवाई केली आहे. पूजा खेडकरला आयएएस सेवेतून बडतर्फ करण्यात आलं आहे. पूजा खेडकरने आयएएस पदासाठी जमा केलेली कागदपत्रं खोटी असल्याचं समोर आलं. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात खटलाही सुरू आहे. आता तिला सेवेतून बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गेल्या आठवड्यात यूपीएससीने पूजा खेडकरची निवड रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यावेळी काही तांत्रिक अडचण आली होती. आता मात्र तिला पदमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर तिनं यूपीएससीच्या या निर्णयाविरोधात दिल्ली हायकोर्टात धाव घेतली होती. यूपीएससीला असा कुठलाही अधिकार नाही तो केवळ केंद्र सरकारच्या कार्मिक मंत्रालयाला आहे, असं तिनं याचिकेत म्हटलं होतं. यावर सुनावणीनंतर कोर्टानं तिला तात्पुरता दिलासा देत तात्काळ कारवाई न करण्याचे निर्देश दिले होते. यासंदर्भात तिची केस सध्या कोर्टात सुरु आहे.



**पूजा खेडकरच्या अडचणी वाढणार**

» अपंगत्वाची अनेक बनावट प्रमाणपत्रं सादर करून तसंच नावात बदल करून पुन्हा यूपीएससीची परीक्षा देण्याची संधी मिळवणाऱ्या ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर हीचा हा सर्व प्रताप उघड झाल्यानंतर आणि माध्यमातून याची मोठ्या प्रमाणावर चर्चा झाल्यानंतर युपीएससीनं तिला नुकतंच सेवेतून बडतर्फ केलं होतं. केंद्र सरकारनंच मोठा निर्णय घेत पूजा खेडकरला प्रशासकीय सेवेतून बडतर्फ केलं आहे. त्यामुळं केंद्रानं केलेली ही कारवाई नियमित स्वरुपात झाली आहे किंवा नाही, हे पाहावं लागणार आहे.

# गणेशोत्सवात भाविकांसाठी 27 ठिकाणी वाहने लावण्याची व्यवस्था

## शहराच्या मध्यभागात मानाच्या गणपतींचे दर्शन, तसेच देखावे पाहण्यासाठी पुणे शहर, तसेच जिल्ह्यातून भाविकांची गर्दी होते.

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवात मध्यभागात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी २८ ठिकाणी वाहने लावण्याची व्यवस्था वाहतूक पोलिसांकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शहराच्या मध्यभागात मानाच्या गणपतींचे दर्शन, तसेच देखावे पाहण्यासाठी पुणे शहर, तसेच जिल्ह्यातून भाविकांची गर्दी होते. उत्सवाच्या काळात परगावाहून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांना मोटारी, तसेच दुचाकी लावण्यासाठी २७ ठिकाणी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली..

विसर्जन मिरवणुकीची सांगता होईपर्यंत भाविकांसाठी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली. मोटारी आणि दुचाकी वाहनांसाठीची पार्किंग व्यवस्था पुढीलप्रमाणे: न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग (दुचाकी), शिवाजी आखाडा, मंगळवार पेठ, (दुचाकी ,चारचाकी), एच.व्ही. देसाई महाविद्यालय, (पोलीस पार्किंग), हमालवाडा, नारायण पेठ, (दुचाकी, चारचाकी), गोगटे प्रशाला, नारायण पेठ, (दुचाकी), एसएसपीएमएस, शिवाजीनगर, (दुचाकी, चारचाकी), स. प. महाविद्यालय, (दुचाकी, चारचाकी), पीएमपीएल मैदान, पूरम चौक, सारसबाग, (चारचाकी), पेशवे पार्क, सारसबाग, (दुचाकी), हरजीवन हॉस्पिटल, सारसबाग, (दुचाकी), पाटील प्लाझा, मित्रमंडळ चौक, (दुचाकी ), पर्वती ते दांडेकर पूल, दुचाकी), दांडेकर पूल ते गणेश मळा, (दुचाकी), गणेश मळा ते राजाराम पूल, (दुचाकी), नीलायम चित्रपटगृह, (दुचाकी, चारचाकी), विमलाबाई गरवारे प्रशाला , डेक्कन जिमखाना, (दुचाकी), आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रस्ता, (दुचाकी, चारचाकी), संजीवन रुग्णालय मैदान, कर्वे रस्ता, (दुचाकी, चारचाकी) आपटे प्रशाला, (दुचाकी), फर्ग्युसन महाविद्यालय, (दुचाकी, चारचाकी), जैन हॉस्टेल, बीएमसीसी रस्ता, (दुचाकी, चारचाकी), मराठवाडा महाविद्यालय, (दुचाकी), पेशवे पथ, (दुचाकी), रानडे पथ, (दुचाकी, चारचाकी), काँग्रेस भवन रस्ता, शिवाजीनगर, (दुचाकी), न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता, ( दुचाकी, चारचाकी), नदीपात्र, भिडे पूल ते गाडगीळ पूल ( दुचाकी, चारचाकी)



# गणेशोत्सवासाठी तीन हजार पोलिसांचा बंदोबस्त

## नोंदणीकृत असलेल्या मंडळांनाही आवश्यकतेनुसार बंदोबस्तासाठी स्वतंत्र पोलिस अधिकारी व कर्मचारी नियुक्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात राहणार आहे. ७ ते १७ सप्टेंबर या दरम्यान श्री गणेशाचे आगमन ते विसर्जन या कालावधीत कोणतेही अनुचित प्रकार होऊ नयेत, यासाठी पोलीस सज्ज राहणार आहेत. ध्वनी पातळी नियंत्रित ठेवण्याच्या सूचनाही पोलिसांनी गणेश मंडळांना केल्या आहेत.



गणेशोत्सव मोठ्या उत्साहात व शांततेने पार पाडावा, कोणताही कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निमार्ण होऊ नये, यासाठी या कालावधीत पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात असणार आहे. एक पोलीस सहआयुक्त, अपर पोलीस आयुक्त, सहा पोलीस उपायुक्त, ११ सहायक पोलीस आयुक्त, ५३ पोलीस निरीक्षक, २४५ सहायक पोलीस निरीक्षक आणि फौजदार, २३३८ पोलीस अंमलदार, ५५० होमगार्ड, एक एसआरपीएफ कंपनी, बॉम्ब शोधक आणि नाशक (बीडीडीएस) पथक, ११ आरसीपी स्ट्रायकिंग एवढा बंदोबस्त सज्ज राहणार आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व पोलीस ठाणे यांनी सर्व गणेश मंडळांच्या व शांतता समितीच्या बैठका घेतल्या आहेत. या बैठकांमध्ये गणेशोत्सव उत्साहात साजरा व्हावा व कोणताही अनुचित प्रकार घडू नये, त्यादृष्टीने सुचना देण्यात आल्या आहेत. नागरीक व गणेशोत्सव मंडळाचे सदस्य, कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या सुचनांचे पालन करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केले आहे.

### प्लास्टिकचा वापर टाळावा अन्यथा दंडात्मक कारवाई

गणेशोत्सव कालावधीत रस्ता पदपथांवर सिझनेबल खाद्यपदार्थ विक्रेत्यांना परवानगी देण्यात येणार नाही. सार्वजनिक मंडळ परिसरात फुलांचे हार, नारळ, मिठाई, प्रसाद इत्यादी दुकाने कमीत कमी असतील याची दक्षता घ्यावी. तसेच अनधिकृत फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास पूर्णपणे प्रतिबंध असेल. रुग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहने, रिक्षा सहजपणे जाऊ शकतील एवढी मोकळी जागा ठेवणे आवश्यक राहील. महाराष्ट्र शासनाचे अधिनियमानुसार प्लास्टिक पिशव्या व इतर प्लास्टिक वस्तूंवर बंदी करण्यात आली आहे. प्लास्टिकचा वापर टाळावा अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### दीड हजार मंडळे

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत दीड हजारांपेक्षा जास्त गणेशोत्सव मंडळांना परवानगी दिली आहे. यात काही मंडळे परवानगी न घेताही गणेशोत्सव साजरा करतात. तसेच काही हाउसिंग सोसायट्या, कंपन्या यांच्याकडूनही गणेशोत्सव साजरा केला जातो. हा गणेशोत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे.

पोलिस आयुक्तालयाकडे तीन सर्वेलन्स व्हॅन आहेत. यातील दोन व्हॅन परिमंडळांकडे तर एक व्हॅन नियंत्रण कक्षाकडे आहे. आवश्यकतेनुसार या व्हॅनच्या माध्यमातून निगराणी केली जाते. तसेच पोलिसांची विविध पथके देखील कार्यान्वित केली आहेत. गणेशोत्सव कालावधीत शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर येते. त्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरात गणेशोत्सवासाठी बाहेरून बंदोबस्त मागवला आहे.

### मंडळांनी कमीत कमी ध्वनीक्षेपकाचा वापर करावा

» सार्वजनिक गणेश मंडळानी गणेश मूर्ती प्रतिष्ठापना केलेल्या परिसरात 'सीसीटीव्ही' कॅमेरे बसवावेत. विद्युत रोषणाईचा व ध्वनिक्षेपकाचा वापर कायदेशीर मर्यादित करावा. ध्वनीची पातळी नियंत्रित ठेवावी. ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) व नियमानुसार रुग्णालय, शैक्षणिक संस्था, न्यायालय, दवाखाने यांचे सभोवताली कमीत कमी शंभर मीटर परिसरात ध्वनीक्षेपकाचा वापर करु नये तसेच मंडळांनी ध्वनीक्षेपकाचा कमीत कमी वापर करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# गणेशोत्सवानिमित्त कोकणवासी पिंपरी-चिंचवडकरांसाठी 'प्रवास सेवा'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विधायक पुढाकार : पहिल्या दिवशी पाच एसटी बस कोकणात झाल्या रवाना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील कोकण-वासीयांसाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रवास सेवा सुलभ व्हावी. या करिता एसटी बस सुविधा सुरू करण्यात आली. पहिल्या दिवशी पाच बस कोकणात रवाना झाल्या. या उपक्रमाचे कोकणवासीयांनी कौतूक केले आहे.



भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाकाराने गौरी-गणपतीसाठी कोकणात जाण्यासाठी उत्सुक असलेल्या भोसरी विधानसभा मतदारसंघातील कोकणवासीयांसाठी एसटी बस उपलब्ध करुन देण्यात आल्या. गेल्या महिनाभरापासून त्याचे 'बुकिंग' सुरू होते. बुधवारी सायंकाळी पहिल्या ५ बसनी कोकणात प्रस्थान केले.

यावेळी आमदार महेश लांडगे, विजय परब, विलास गवस, सुधाकर धुरी, अमित महाडिक, सुनील साळुंखे, संदीप साळुंखे यांच्यासह सर्व सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथील मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी चिखली ते दोडामार्ग, यमुनानगर ते सावंतवाडी, भोसरी ते सावंतवाडी अशा पाच गाड्या प्रवाशांना घेवून रवाना झाल्या. आज पुन्हा २१ नवीन एसटी बस प्रवाशांना घेवून कोकणात जाणार आहेत.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत कोकणमधील नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. गणेशोत्सव आणि कोकणाचे अनोखं नाते आहे. कोकणात जाण्यासाठी एसटी बस फूल होतात. नागरिकांना कोकणात जाण्यासाठी अडचणी येतात. त्यामुळे भोसरी मतदारसंघात वास्तव्यास असलेल्या चाकरमान्यांसाठी बस सुविधा सुरु केली आहे. देव-देश अन् धर्मासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे.

### एसटीचा संप असतानाही पाच बस रवाना

» वास्तविक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्यामुळे बुधवारी बूक केलेल्या पाच बस कोकणात जाणार की नाही? असा संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, आमदार महेश लांडगे यांनी कर्मचारी व व्यवस्थापन यांच्यात मध्यस्थी केली आणि कोकणवासीयांना पूर्वनियोजनाप्रमाणे प्रवास करण्यासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन केले. त्यामुळे पाच बस रवाना झाल्या. परिणामी, कोकणवासी चाकरमान्यांचा उत्साह द्विगुणित झाला. भोसरी मतदारसंघातून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या ठिकाणी जाण्यासाठी ४ सप्टेंबर आणि ५ सप्टेंबर २०२४ रोजी एसटी बस सोडण्यात आल्या आहेत.



# गणेशोत्सवात 'या' दिवशी 24 तास धावणार मेट्रो

## इतर दिवशी वेळ आणि फेऱ्यांची संख्या वाढवली : गणेशभक्तांच्या सोयीसाठी 'पुणे मेट्रो'चा निर्णय



**पुणे | प्रतिनिधी**

अवघे पुणे उत्साहाने ज्या उत्सवाची वाट पाहात होते, तो गणेशोत्सव शनिवारपासून (दि. ७) थाटामाटात सुरू होत आहे. या काळात शहरातील गणेशोत्सवातील देखावे, रोषणाई पाहण्यासाठी येणाऱ्या हजारो भाविकांना सुविधाजनक आणि त्रासमुक्त प्रवास सेवा देण्यासाठी पुणे मेट्रोही सज्ज झाली आहे. १७ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जनाच्या दिवशी म्हणजे अनंत चतुर्दशीला 'पुणे मेट्रो' भाविकांसाठी २४ तास सेवा पुरवणार आहे.

या उत्सवकाळामध्ये 'पुणे मेट्रो' आपल्या सेवेचा कालावधी वाढवणार आहे. तसेच 'मेट्रो' फेऱ्यांची संख्याही वाढवणार आहे. ७ ते ९ सप्टेंबरपर्यंत मेट्रो सेवा सकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत चालणार आहे. उत्सवाच्या पहिल्या टप्प्यातील हा सेवेतील विस्तार प्रवासीसंख्येतील संभाव्य वाढ लक्षात घेऊन करण्यात आला आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने प्रवासी मेट्रो सेवेचा लाभ घेऊ शकतील तसेच १० ते १६ सप्टेंबर दरम्यान मेट्रो सेवेची वेळ आणखी वाढवली जाईल. या काळात मेट्रो सकाळी सहा ते मध्यरात्री १२ पर्यंत सेवा पुरवणार आहे. त्यामुळे प्रवाशांची आणखी सोय होण्यास मदत होईल.

पुणे मेट्रोच्या विस्तारित सेवेंतर्गत गणेश विसर्जनाच्या दिवशी म्हणजे १७ सप्टेंबर रोजी मेट्रो सकाळी ६ ते १८ सप्टेंबर रोजी सकाळी ६ पर्यंत अखंड धावेल. गणेश विसर्जनाच्या दिवशी विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी शहराच्या विविध भागातून भाविक मोठ्या संख्येने असतात. उत्सव या काळात शिगेला पोहोचलेला असतो. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या संख्येने सामावून घेऊन त्यांना सोयीस्कर प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा या २४ तासांच्या सेवेमागील उद्देश आहे.

या विस्तारित सेवेदरम्यान वाढलेल्या प्रवाशांच्या सोयीसाठी त्यांना डिजिटल तिकीट नोंदणीचा पर्याय पुणे मेट्रोने उपलब्ध करून दिला आहे. प्रवाशांनी तिकीट खरेदीसाठी 'पुणे मेट्रो मोबाईल ॲप' आणि 'व्हॉट्स ॲप तिकीट सेवा' वापरण्याचे आवाहन 'पुणे मेट्रो'ने केले आहे. तिकिटांसाठी प्रवाशांची लांबलचक रांग आणि तिकीट काउंटरवरील गर्दी टाळण्यासाठी ही डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. जेणेकरून प्रवाशांना विनाअडथळा तिकीट मिळवून प्रवासाला सुरुवात करता येईल.

### कमी वेळेत प्रवास करण्यास मदत

» "पुणेकर नागरिकांना आणि बाहेरगावाहून येणाऱ्या गणेशभक्तांना गणेशोत्सवाचा आनंद लुटता यावा, या कटिबद्धतेतून आम्ही सेवा विस्ताराचे नियोजन केले आहे. आम्ही सर्व प्रवाशांना त्यांच्या प्रवासाचे वेळेपूर्वी नियोजन करण्याचे आवाहन करतो. प्रत्येकाला या विशेष प्रसंगाचा आनंद लुटण्यासाठी सुविधाजनक आणि कमी वेळेत प्रवास करण्यास मदत करणे हे आमचे ध्येय आहे," असे 'पुणे मेट्रो'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.




# गणेशोत्सवात 7 हजार पोलीस ठेवणार कडेकोट बंदोबस्त

## उत्सवाच्या काळात संभाव्य घातपाती कारवाया, अनुचित घटनांचा धोका विचारात घेऊन पोलिसांकडून बंदोबस्ताची आखणी



**पुणे | प्रतिनिधी**

शहराची वैभवशाली परंपरा असलेल्या गणेशोत्सवाला शनिवारी प्रारंभ होत आहे. पुणे पोलिसांकडून उत्सवाच्या कालावधीत शहर, तसेच उपनगरात कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन केले असून, 7 हजार पोलिस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत.

उत्सवाच्या काळात संभाव्य घातपाती कारवाया, अनुचित घटनांचा धोका विचारात घेऊन पुणे पोलिसांकडून बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे उपायुक्त जी. श्रीधर यांनी बंदोबस्ताची आखणी केली आहे. उत्सवाच्या कालावधीत मध्यभागात होणारी गर्दी विचारात घेऊन पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. भाविकांचे मोबाइल, दागिने चोरी, तसेच अनुचित प्रकार रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलिस कार्यरत असणार आहेत.

उत्सवाच्या कालावधीत पाच हजार पोलिस अधिकारी-कर्मचारी, शीघ्र कृती दल, गुन्हे शाखेची पथके, बाहेरगावाहून मागवण्यात आलेले पोलिस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान, केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्यांचा बंदोबस्तामध्ये समावेश आहे. तसेच पोलिस मित्रांची मदत देखील घेतली जाणार आहे. मानाच्या मंडळांसह गर्दीच्या ठिकाणची बॉम्बशोधक, नाशक पथकाकडून तपासणी केली जाणार आहे. तर गर्दीच्या ठिकाणांची पथकातील प्रशिक्षित श्वान, पोलिस कर्मचारी गर्दीच्या ठिकाणाची दिवसभरातून चारवेळा तपासणी करण्यात येणार आहे.

उत्सवाच्या काळात शहरातील मध्यभागात १८ पोलिस मदत केंद्र सुरू करण्यात येणार आहे. उत्सवाची सांगता होईपर्यंत मदत केंद्रांचे कामकाज अहोरात्र सुरू राहणार आहे. या केंद्रांत स्थानिक पोलिस ठाणे, विशेष शाखा, गुन्हे शाखा आणि वाहतूक शाखेतील कर्मचारी तैनात असणार आहेत. उत्सवाच्या कालावधीत ६ ठिकाणी शीघ्र कृती दल तैनात करण्यात येणार आहेत. हे जवान मनोऱ्यावरून गर्दीवर लक्ष ठेवणार आहेत. गर्दीतील गैरप्रकार, तसेच संशयितांवर नजर ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

### 1800 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

» शहरातील १८०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे गर्दीवर नजर ठेवली जाणार आहेत. प्रत्येक मंडपाच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या सूचना पोलिसांनी गणेश मंडळांना दिल्या आहेत. उत्सवाच्या कालावधीत शहरात राज्यासह देशाच्या वेगवेगळ्या भागातून नागरिक दर्शनासाठी येतात. परदेशी नागरिकांची देखील मोठ्या संख्येने उपस्थिती असते. त्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेकडून सराईतांची यादी तयार करण्यात आली असून, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई सुरू करण्यात आली.